कार्यालय ग्रामपंचायत खैरी/वलमाझरी

पंचायत समिती साकोली दिनांक २०/०१/२०२३

# ✻ ग्रामसभेची जाहीर सुचना ✻

सर्व ग्रामसभेच्या सदस्यांना सुचित करण्यात येते की, ग्रामपंचायत खैरी/वलमाझरी ची ग्रामसभा दिनांक ३०/०१/२०२३ रोज ------------ ला ठिक १०:३० वाजता स्थळ ग्रा.पं. कार्यालय ठिकाणी श्री पुरुषोत्तम जनेशराम डवमोडे हयांचे अध्यक्षतेखाली खालील विषयावर चर्चा करण्यास्तव घेण्यात येईल. सबब वेळेवर उपस्थित राहण्याचे करावे.

## ✻ कामकाजाचे विषय ✻

१) मागील ग्रामसभेचे कार्यवृत्त वाचुन कायम करणे.
२) सन २०२२-२०२३ चा वार्षिक जमाखर्च अहवाल वाचुन मंजूर करणे
३) शासकिय परीपत्रक वाचन करणे.
४) शासकिय विविध योजनेची माहिती देऊन लाभार्थी निवड करणे.
५) सन: २०२३-२०२४ मध्ये करावयाची कामे व त्यांना मंजुरी प्रदान करणे.
६)
७)
८)
९)
१०) मा. अध्यक्षाचे अनुमतीने वेळेवर येणारे विषय.

टिप:- १) वरीलपैकी अनावश्यक विषय खोडुन टाकावे. २) ग्राम सभा खालील नियमावली नुसार चालविण्यात येईल. गणपुर्तीच्या अभावी सभा तहकुब झाल्यास हिच ग्रामसभा नियमाच्या तरतुदीनुसार बोलविण्यात येईल.

ग्रामसेवक/ग्रा.वि.अ.
ग्रा.पं. गट ग्रा. पं. खैरी/वलमा
पं. स. साकोली

सरपंच
ग्रा.पं. गट ग्रा. पं. खैरी/वलमा.
पं. स. साकोली

प्रतिलीपी:- १) श्रीमान खंडविकास अधिकारी पं.स. साकोली
२) श्रीमान सभापती साहेब पं.स. साकोली
३) श्रीमान मुख्य कार्यकारी जिल्हा परिषद भंडारा यांचे माहिस्तव सादर
४) श्रीमान पोलीस स्टेशन अधिकारी साकोली यांना सभेत उपस्थित राहण्यास सादर
५) श्रीमान/श्रीमती ४ नावे आंगणवाडी सेविका/आरोग्य सेविका/ मुख्याध्यापक/ ४ आपे हयांना ग्रामसभेत उपस्थित राहण्यास सादर
६) ग्रामपंचायत नोटीस बोर्डावर प्रसिद्धी करीता सादर

## ✻ ग्रामसभेची नियमावली ✻

१) ग्रामसभेच्या सभेमध्ये कोणतीही सुचना माडण्याची एखादया इसमाची ईच्छा असल्यास त्याने ती सुचना तारखेच्या कमीत कमी दोन दिवसा आधि सरपंचाकडे किंवा त्यांच्या अनुपस्थित उपसरपंचाकडे पाठविले पाहिजे. नोटिस प्रसिद्ध होण्यापुर्वी किंवा प्रसिद्ध झाल्यानंतर मिळालेली अशी कोणतीही सुचना ग्रामसभेच्या सभेपुढे ठेवण्यात यावी किंवा त्याच्या अनुपस्थित उपसरपंचाने ठरविले पाहिजे.

२) सरपंचास किंवा त्या अनुपस्थित उपसरपंचास पुढिल कोणत्याही कारणावरुन अशी सुचना माडल्याची परवानगी नाकारण्याचा अधिकार आहे.(अ) अशी सुचना बदनामीच्या स्वरूपाची असेल तर (ब) अशा सुचनेतील भाषा अपसमानास्पद असेल तर (क) अशी सुचना लोकशाहित विरोध असेल तर (ड)अशी सुचना शुल्लक स्वरूपाची असेल तर (ई) अशी सुचना ही न्याय प्रविष्ठ बाबीच्या संबंधातील सुचना असेल तर.

३) एखादी सुचना ग्रामसभेच्या अधिकारा बाहेरची आहे. असे अध्यक्षांना वाटल्यास त्यावर चर्चा करण्याची नाकारण्याचा त्यास अधिकार आहे.

४) सभेतील कामकाजाचे नियम करणे आणि व्यवस्था राखने हे अध्यक्षाचे कर्तव्य असेल तर त्या करणासाठी आवश्यक असलेले सर्व अधिकार त्यास असतील.

५) जर कोणताही सदस्य अध्यक्षाच्या अधिकाराचा अनादर करील किंवा सभेत अडथळा निर्माण करणारी किंवा त्रासदायक वर्तवणुक केल्याबद्दल तो दोषी असेल किंवा सभेच्या कामकाजात तो व्यत्यय आणील तर अशा इसमास सभेतुन काढुन टाकण्याचा अधिकार असेल.

६) मतदान यादीत ज्यांचे नांव आहे त्यानांच ग्रामसभेची सुचना मांडण्याची व बोलण्याची परवानगी आहे.

-सही-
सरपंच
ग्रामपंचायत गट ग्रा. पं. खैरी/वलमा.